पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांमधे राबविला जाणारा प्रयोगजीवी कला अभ्यासक्रम
(बी.पी.ए.)

२०१२–२०१३

बी.पी.ए. प्रथम वर्ष – नृत्य

## बी.पी.ए. प्रथम वर्ष (नृत्य)

### सर्वसाधारण निर्देश :-

- विद्यार्थ्यांना एकावेळी संगीत, नृत्य, नाट्य यांपैकी एकाच विषयाचा अभ्यासक्रम शिकता येईल.
- एक प्रात्यक्षिक तासिका ही एका सैध्दांतिक तासिकेइतकी मोजली जावी.
- प्रत्येक अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला सैध्दांतिक अभ्यासक्रमासाटी विद्यापीठाने ठरवलेल्या कालावधीची एक तासिका २५–३० विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असेल.
- नृत्य – सामान्य अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला प्रात्यक्षिक अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने ठरविलेल्या कालावधीच्या ३ तासिका १०–१२ विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असतील.

### उपस्थितीविषयक निर्देश :-

- हे सर्व अभ्यासक्रम नियमित विद्यार्थ्यांसाठी आहेत. बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी नाहीत.
- बी.पी.ए. नृत्य विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विषयाच्या स्वरुपानुसार महाविद्यालयातील संबंधित तासिकांना किमान ८०% उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

### गुणविभाजन विषय निर्देश :-

- बी.पी.ए. प्रथम वर्ष– (नृत्य) करिता एकूण ८०० गुणांचा अभ्यासक्रम असेल.
- ८०० गुणांची होणारी परीक्षा खालील विषयांची असेल.

| | एकूण | सत्र १ | | सत्र २ | |
|---|---|---|---|---|---|
| | | अंतर्गत | परीक्षा | अंतर्गत | परीक्षा |
| भाषा इंग्रजी (अनिवार्य) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| भाषा मराठी (अनिवार्य) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| सेध्दांतिक १ (शाखानिहाय) (संगीत) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| सेध्दांतिक २ (शाखानिहाय) (संगीत) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| प्रात्यक्षिक परीक्षा + मौखिक | २०० | – | १०० | – | १०० |
| वार्षिक मंचप्रदर्शन | २०० | – | – | – | २०० |
| – | ८०० | | | | |

–

- अंतर्गत मुल्यांकनाव्यतिरिक्त प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४०% गुण मिळविणे आवश्यक आहे. उदा. इंग्रजी विषयात सत्र १ मधे ४० पेकी १६ गुण मिळवणे आवश्यक आहे.

महाविद्यालयासाठी आवश्यकता :–

- संगीत, नृत्य, नाट्य या कला प्रयोगजीवी कला असल्याने यासाठी इतर विभागांपासून दूर जागा असावी.
- सदर विषयांसाठी स्वतंत्र खोल्या असाव्यात.
- विद्यार्थ्यांच्या रियाजासाठी स्वतंत्र खोल्या असाव्यात.
- स्वतंत्र ग्रंथालय असावे व त्यात सॆध्दांतिक व प्रात्यक्षिकांसाठीची कमीत कमी २०० पुस्तके असावीत.
- ग्रंथालयात सी.डी. व व्ही.सी.डी. असाव्यात.
- विद्यार्थ्यांना संगीत ऐकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.
- या प्रयोगजीवी कलांसाठी स्वतंत्र प्रेक्षागृह असावे.
- नृत्य व नाट्यासाठी आवश्यक ती प्रकाशयोजना असावी.
- या तीनही कलांसाठी ध्वनीवर्धकांची व्यवस्था करण्यात यावी.
- मेकअप रुम, मेकअप साहित्य(रंगभूषा) व वेशभूषा सज्जा असावी.
- संगीतासाठी स्त्री व पुरुष गायक व वादकांसाठी वाद्यांचे त्या–त्या आवाज गुणधर्मानुसार तानपुरे, इलेक्ट्रॉनिक तानपुरे व तबले, हार्मोनियम व लेहरा मशिन यांची व्यवस्था करावी.
- रियाजासाठी साउंड प्रूफ रुम असावी.

**पेपर १: भाषा : इंग्रजी (अनिवार्य)**

अभ्यासक्रमाचा आराखडा :

बी.पी.ए. प्रथम वर्ष अनिवार्य इंग्रजी

(सामान्य १) (compulsory English G1) हा उपलब्ध अभ्यासक्रम वेळोवेळी होणाऱ्या बदलांसह व मार्गदर्शक तत्वांसह राबवला जावा.

**पेपर २ :– भाषा : मराठी (अनिवार्य)**

अभ्यासक्रमाचा आराखडा :

वरीलप्रमाणे

## बी.पी.ए. नृत्य (भरतनाट्यम्)

### प्रथम वर्ष

पेपर १ भाषा : इंग्रजी

पेपर २ भाषा : मराठी

पेपर ३ :

सत्र १

- नृत्याची व्याख्या व नर्तनाचे स्तर – आदिवासी नृत्य, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, सिनेनृत्य व आधुनिक नृत्य इ.
- नृत्त, नृत्य व नाट्य यातील भेद
- नृत्यातील संगीताचे स्थान
- शास्त्र आणि परंपरा
- चतुर्विध अभिनय – आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक
- शास्त्रीय नृत्यातील नाट्यतत्व

सत्र २

- शास्त्रीय नृत्यशैलींचा पुढील संदर्भात तुलनात्मक अभ्यास – उगम, इतिहास, वेशभूषा, रचनाक्रम, संगीत व ग्रंथ इ.

पेपर ४ :

सत्र १

- लय म्हणजे काय?
- अभिनय दर्पणानुसार – नाट्यक्रम, पात्रप्राण, पादभेद, शिरोभेद, दृष्टीभेद, मंडलपाद, स्थानकपाद.
- नाट्यशास्त्रानुसार – पादभेद

- संयुतहस्त व असंयुत हस्त आणि त्यांचे सर्व विनियोग

सत्र २

- कर्नाटक तालपध्दती – सप्तताल, पंचजातींप्रमाणे
- व्याख्या – अ्गी, जाती, ताल, मात्रा, सम, विषम, अक्षर
- अलारिपू लिपीबध्द करणे
- कौतुअम् लिपीबध्द करणे

**पेपर ५ : प्रात्यक्षिक परीक्षा आणि मौखिक परीक्षा**

**सत्र १**

- अडवू प्रकार – तट्ट, नाट्ट, पक्क, तट्टपक्क/मेट्ट, कुदित्तमेट्ट, तट्टकुदित्तमेट्ट/कुत्त, मंडी, तिरमाणम् अडवू– गिणतोम्
- अभिनयदर्पण
  नाट्यक्रम, असंयुत व संयुतहस्त(प्रत्येकातील पहिले १० विनियोगांसहित)

**सत्र २**

- अडवू प्रकार – शिखर, सरक/सारिका/सरिक्कल,पेरी, तट्टीमेट्ट, तिरमाणम् अडवू– तरिकिटतोम्
- अभिनयदर्पण– पात्रप्राण, स्थानक, मंडलपाद, शिरोभेद, दृष्टीभेद, ग्रीवाभेद.

पेपर ६ : मंचप्रदर्शन

- अलारिपू प्रस्तावनेसह
- नमन श्लोक प्रस्तावनेसह
- कौतुअम् प्रस्तावनेसह
- शिकविलेली रचना तालात म्हणणे.
- मंचप्रदर्शनासाठी २० मिनिटांचे नृत्य सादरीकरण करणे.

## बी.पी.ए. नृत्य (कथक)

### प्रथम वर्ष

पेपर १ भाषा : इंग्रजी

पेपर २ भाषा : मराठी

पेपर ३ :

सत्र १

- नृत्यगुरुंचा जीवनपरिचय – पं. अच्छन महाराजजी, पं. सुखदेव महाराजजी, पं. सुंदरप्रसादजी
- ताल संकल्पना – तालांची माहिती व उपयोजन – तीनताल, झपताल, रुपक, दादरा, केरवा.
- सखोल अभ्यास
  १. नृत्यप्रस्तुती वा वस्तुक्रमच्या उद्देशाने – काळानुसार फरक – मंदिर परंपरा, मुघल काळ, ब्रिटीश काळ, स्वातंत्र्योत्तर घराण्यांची संक्षिप्त माहिती आणि त्या घराण्यांतील नृत्यप्रस्तुतीमधील फरक
  २. कथक नृत्याची साथसंगतीची वाद्ये व त्यांचे कथक नृत्यातील महत्व – तबला, पखावज, सारंगी व कंठसंगीत
  ३.ताललेखन पध्दती – तीनताल, झपताल, रुपक ठेका– एकगुन, दुगुन, चौगुन
  ४. भारतीय नृत्यपरंपरांचा अभ्यास – भरतनाट्यम्, मणिपुरी, मोहिनीअट्टम्, कथकली, कुचीपुडी, ओडिसी, त्या–त्या प्रांतातील लोकपरंपरा व शास्त्रीयतेचे नाते.

सत्र २

- नृत्यगुरुंचा जीवनपरिचय – पं. शंभू महाराजजी, रुक्मिणीदेवी अरुंडेलजी, केलुचरण मोहापात्राजी.
- ताल संकल्पना – तालांची सखोल माहिती व उपयोजन – रुपक, धमार, दीपचंदी, भजनी धुमाळी.
- सखोल अभ्यास
  कथक नृत्यातील महत्वाच्या संज्ञा व त्यांच्या परिभाषा –
  १. लास्य– तांडव २. नृत्त–नृत्य व नाट्य ३. ताल– लय ४. गतभाव– गतनिकास
  ५. वंदना
- कथक नृत्याची साथसंगतीची वाद्ये व काही महत्वाचे संगतकार – तबला (संपूर्ण), हार्मोनियम, सितार, सरोद, बासरी.
  १. पं. कंठे महाराजजी २. पं. सामताप्रसादजी ३. उ. लतिफ़् अहमदजी ४. पं. गोपाल मिश्रा जी
- भारतीय नृत्यपरंपरेतील आधुनिक नृत्यरचना व संरचनाकार यांचा अभ्यास
  १. पं. उदयशंकर २. मॅडम मेनका ३. गुरुदेव रविंद्रनाथ टागोर

पेपर ४ :

सत्र १

- कथक नृत्यातील पारिभाषिक संज्ञा – ठाट, आमद, परण, परमेलू, कवित्, नटवरी
- व्याख्या – लय, ताल, ठेका, मात्रा, सम, विभाग, टाळी, खाली, तिहाई, चक्रदार.
- ताललेखन – तीनताल, झपताल, रुपक, यांमधील बंदिशींचे भातखंडे पध्दतीने नोटेशन लिहीणे – आमद–१, परण–१, नटवरी–१, कवित्–१, चक्रदार–१, तिहाई–१.
- कथक नृत्यात वापरल्या जात असलेल्या फॉर्म्सची माहिती– ठुमरी, भजन, दोहा, कजरी, झुला.
- नवे प्रयोग
  कथक नृत्यगुरुंचे योगदान

१. पं. लच्छू महाराजजी २. पं. सितारादेवी ३. पं. बिरजू महाराजजी ४. पं. गोपीकृष्ण जी

५. पं. रोहिणी भाटे जी.

**सत्र २**

- नग्म्याची ओळख व कथक नृत्यातील महत्व– काही लोकप्रिय नग्मे– तीनताल, झपताल, रुपक
- तालांचे ज्ञान – अष्टमंगल (११ मात्रा), रास (१३ मात्रा), मत्त (९ मात्रा)
  वरील तालांचे ठेके एकगुन, दुगुन, चौगुन मधे भातखंडे पध्दतीने लिहीणे.
- तिहाई – चक्रदारचे मूळ हिशोब
  संदर्भ– तीनताल, झपताल
- भारतीय परंपरेतील आधुनिक नृत्यरचनाकार / संरचनाकार
  १. रामगोपाल जी २. शांतीबर्धन जी ३. कुमुदिनी लाखिया जी.
- कथक नृत्यामधे आवश्यक तांत्रिक बाबींची माहिती.
  नेपथ्य, प्रकाश, ध्वनी, वेशभूषा, रंगभूषा.

**पेपर ५ : प्रात्यक्षिक परीक्षा आणि मौखिक परीक्षा**

**सत्र १**

- वंदना – गणेश – ५ मिनिटे
- तीनतालमधील १० मिनिटांचा वस्तुक्रम
- तराणा आणि भजन

**सत्र २**

- वंदना – कृष्ण – ५ मिनिटे
- रुपक अथवा झपतालमधील १० मिनिटांचा वस्तुक्रम

पेपर ६ : मंचप्रदर्शन

- वंदना – शिव, दुर्गा– ५ मिनिटे
- तीनताल–(सखोल व विस्तृत) १० मिनिटांचा वस्तुक्रम
- धमार अथवा चौताल संक्षिप्त स्वरुपात १० मिनिटांचा वस्तुक्रम.
- ठुमरी – ५ मिनिटे
- मंचप्रदर्शनासाठी २० मिनिटांचे नृत्य सादरीकरण करणे.

शुभांगी बहुलीकर

संदर्भग्रंथ :-


- भारतीय प्रयोगकला : परिचय आणि इतिहास (नृत्य) – निलिमा कढे, स्मिता महाजन.
- कथक नृत्य शिक्षा (भाग १ व २) – गुरु दधिच.
- कथक – सुनील कोठारी.
- भरतनाट्यम् – सुनील कोठारी.
- संगीत रत्नाकर : भाषांतर – डॉ. ग.ह.तारळेकर (भाग १ व २)
- नाट्यशास्त्र – भरतमुनी : भाषांतर – बाबुलाल शास्त्री.
- अभिनयदर्पण : भाषांतर – डॉ. मनमोहन घोष.
- रसविचार – र.पं.कंगले.
- इंडियन क्लासिकल डान्स – डॉ. कपिला वात्सायन.
- कथक दर्पण दीपिका – पं. रोहिणी भाटे.
- शृंगारनायिका – स.आ.जोगळेकर.


शुभांगी बहुलीकर

---***---